जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2017

तरुण भारत

# विद्यापीठाचा भारतीय समुद्रविज्ञान संस्थेशी करार

प्रतिनिधी
कोल्हापूर

समुद्रविज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाचा गोव्याच्या भारतीय समुद्रविज्ञान संस्थेसोबत (एनआयओ) सामंजस्य करार करण्यात आला. एनआयओचे संचालक डॉ. सुनीलकुमार सिंग आणि विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. एनआयओच्या कार्यालयात झालेल्या कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व वैज्ञानिक यांना भविष्यात समुद्रविज्ञानाशी निगडित महत्वाच्या विषयांवर संशोधन कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. डी.व्ही. मुळे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी.व्ही. अनभुले तसेच राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेचे डॉ.रणधीर मुखोपाध्याय, डॉ.बबन इंगोले, डॉ.रमेश कुमार, डॉ.सोनिया सुकुमारन, डॉ.मंदार नान्नजकर आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : गोव्याच्या भारतीय समुद्रविज्ञान संस्थेसमवेत (एनआयओ) सामंजस्य करार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व एनआयओचे संचालक डॉ. सुनिलकुमार सिंग. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2017

महाराष्ट्र टाईम्स




शिवाजी विद्यापीठ आणि समुद्र विज्ञान संशोधन संस्थेसोबत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना डॉ. विलास नांदवडेकर आणि डॉ. सुनीलकुमार सिंग. मध्यभागी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

# शिवाजी विद्यापीठाचा 'समुद्रविज्ञान'शी करार

**कोल्हापूर** : समुद्रविज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाचा गोव्याच्या भारतीय समुद्रविज्ञान संस्थेसमवेत (एनआयओ) सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत एनआयओच्या कार्यालयात आठ ऑगस्टला करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व वैज्ञानिक यांना भविष्यात समुद्रविज्ञानाशी निगडीत महत्त्वाच्या विषयांवर संशोधनकार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे मत कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. यावेळी एनआयओचे संचालक डॉ. सुनीलकुमारसिंग आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, प्राणिशास्त्र अधिविभागाचे डॉ. डी. व्ही. मुळे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी. व्ही. अनभुले तसेच राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेचे डॉ. रणधीर मुखोपाध्याय, डॉ. बबन इंगोले, डॉ. रमेश कुमार, डॉ. सोनिया सुकुमारन व डॉ. मंदार नात्रजकर उपस्थित होते.

13 AUG 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय समुद्रविज्ञान संस्थेशी विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समुद्रविज्ञान संशोधनाच्या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाचा गोव्याच्या भारतीय समुद्रविज्ञान संस्थेसमवेत (एनआयओ) सामंजस्य करार करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत एनआयओच्या कार्यालयात नुकताच हा सामंजस्य करार करण्यात आला. या करारामुळे दोन्ही संस्थांमधील संशोधक विद्यार्थी व वैज्ञानिक यांना भविष्यात समुद्रविज्ञानाशी निगडित महत्त्वाच्या विषयांवर संशोधन कार्य करण्याची संधी उपलब्ध होणार असल्याचे मत यावेळी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. यावेळी एनआयओचे संचालक डॉ. सुनीलकुमार सिंग आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. यावेळी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. पी.डी. राऊत, प्राणीशास्त्र अधिविभागाचे डॉ. डी.व्ही. मुळे, रसायनशास्त्र विभागाचे डॉ. पी.व्ही. अनभुले तसेच राष्ट्रीय समुद्रविज्ञान संस्थेचे डॉ. रणधीर मुखोपाध्याय, डॉ.बबन इंगोले, डॉ.रमेश कुमार, डॉ. सोनिया सुकुमारन व डॉ.मंदार नान्नजकर उपस्थित होते.



**कोल्हापूर : सामंजस्य कराराची देवाण-घेवाण करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व डॉ. सुनीलकुमार सिंग. शेजारी डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. डी. राऊत आदी मान्यवर.**

13 AUG 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरचा २०० वर्षांपूर्वीचा इतिहास उलगडणार

## मेजर डी.सी. ग्रॅहॅमचा रिपोर्ट आद्य ग्रंथाच्या माध्यमातून उद्या प्रकाशित होणार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूरमधील तत्कालीन पोलिटिकल सुप्रिंटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅमचा रिपोर्ट कोल्हापूरच्या इतिहासाचा आद्य ग्रंथ म्हणून सोमवारी (दि.१४) प्रकाशित होणार आहे. 'स्टॅटिस्टीकल रिपोर्ट ऑन द प्रिन्सीपॅलिटी ऑफ कोल्हापूर' असे ग्रंथाचे नाव आहे.

ग्रंथाचा प्रकाशन सोहळा शिवाजी विद्यापीठातील शाहू सिनेट सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. ग्रंथाचे प्रकाशन अर्थ व कृषितज्ज्ञ डॉ. यशवंतराव थोरात यांच्या हस्ते, श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे




यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार आहे. १८५४ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीच्या आदेशावरून कोल्हापूरमधील पोलिटिकल सुप्रिंटेंडंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी सातत्याने सात वर्षे श्रम घेऊन संकलित केलेला हा साधन ग्रंथ आहे.

यामध्ये २०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूरचे लोकजीवन, उद्योगधंदे, कृषिजीवन, कला, साहित्य यांची अतिशय बारकाईने माहिती दिली ग्रंथामध्ये देण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील मराठी, कानडी आणि पार्शियन भाषेतील जवळजवळ २५ ते ३० शिलालेखांची माहिती यात आहे. इंग्रज सरकार व कोल्हापूरकर छत्रपती यांच्यातील करार तसेच पत्रव्यवहार या ग्रंथात दिला आहे.

२०० वर्षांपूर्वीचे कोल्हापूर कसे होते? राजर्षी शाहूपूर्व काळ कसा होता? याचे दर्शन घडवणारा हा एकमेव दस्तऐवज आहे. गेली १०० वर्षे हा ग्रंथ उपलब्ध नव्हता. ठिकठिकाणाहून त्याच्या प्रती मिळवून, शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्राचे संचालक डॉ. जयसिंगराव पवार त्यावर संशोधन व संपादकीय संस्कार करण्याचे काम तीन वर्षे करत होते. या ग्रंथास त्यांनी ५६ पानांची अत्यंत विवेचक व अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनेत संपूर्ण ग्रंथाचे सार पाहावयास मिळते. डॉ. पवारांनी संपादित केलेला हा मेजर ग्रॅहॅमचा ग्रंथ इतिहासाचे एक अव्वल दर्जाचे प्राथमिक साधन आहे.

13 AUG 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी साकारली 'ट्री गणेश'मूर्ती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत 'ट्री गणेश'मूर्ती तयार करताना विद्यार्थिनी.

प्रतिनिधी
कोल्हापूर

पाणी प्रदूषण रोखण्यासाठी शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाने 'ट्री गणेशा' कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत १५० विद्यार्थ्यांनी शाडूपासून 'ट्री गणेश'मूर्ती तयार केल्या. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी बनवलेल्या गणेश मूर्तींच्या विसर्जनानंतर यामध्ये रूजवलेल्या बियातून सुंदर फुले उमलणार आहेत. स्वत: तयार केलेल्या गणेशमूर्तीची घरात प्रतिष्ठापना करण्याचा आनंद वेगळाच असल्याच्या प्रतिक्रिया सहभागी विद्यार्थ्यांनी दिल्या.

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरण विभागातर्फे आयोजित 'ट्री गणेशा' या कार्यशाळेत टेराकोटा कलाकार गौरव काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली १५० विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या. विद्यापीठ, शांतीनिकेतनसह अन्य शाळेतील विद्यार्थी या कार्यशाळेत सहभागी झाले होते. ७० किलो शाडूच्या मातीतून १० प्रकारच्या विविध रुपातील मूर्ती तयार केल्या आहेत. विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विज्ञान परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार प्रमुख उपस्थित होते.

**७० किलो शाडूच्या मातीतून १० प्रकारच्या मूर्ती तयार**

गणेश विसर्जनाच्या दिवशी विद्यापीठातील पर्यावरण विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक काहीलीत गणपती विसर्जन करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून 'ट्री गणेशा' कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत तयार केलेल्या गणेशमूर्तीमध्ये फुलझाडांच्या बिया रुजविल्या आहेत. प्रतिष्ठापना केल्यानंतर मूर्तीला पाणी घातले तर दोन ते तीन दिवसात या मुर्तीत रूजवलेल्यां बियातून फुलझाडे उगवतील, आणि मुर्ती आकर्षक दिसेल. गणेश विसर्जनानंतर या गणपतीची मुर्ती कुंडीत ठेवली तर घरासमोर परसबाग फुलणार आहे.

विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत यांनी पर्यावरण संवर्धनातील एक भाग म्हणून जाणीवपुर्वक 'ट्री गणेशा' हा उपक्रम राबवला आहे. अशा उपक्रमांच्या माध्यमातून पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची संकल्पना समाजामध्ये रूजवण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2017
लोकमत

# विद्यापीठातील ट्री गणेश कार्यशाळेस चांगला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्यावतीने शनिवारी येथे ट्री गणेश कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेमध्ये पर्यावरणशास्त्र विभागाचे ९० विद्यार्थी आणि बाहेरील शाळांमधील २५ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. कार्यशाळेस अत्यंत चांगला प्रतिसाद लाभला.

सालाबादप्रमाणे यावर्षीदेखील गणेशोत्सवाचे वातावरण सुरु झाले आहे. प्लास्टरच्या गणेशमूर्तींनी होणारे पर्यावरणाचे प्रदूषण थांबविण्यासाठी अनेक वेगवेगळे पर्याय अनेक संस्था, संघटना, मंडळे यांच्याकडून शोधले जातात आणि त्याचा प्रचार-प्रसार केला जातो. याच जाणिवेतून ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

गौरव काईंगडे या मूर्तिकारांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाडूची गणेशमूर्ती बनवून, ती वाळल्यानंतर त्यामध्ये फुलाच्या बिया खोवून या मूर्तीची निर्मिती करण्यात येते. या गणेशमूर्तीचे घरीच एखाद्या कुंडीमध्ये विसर्जन करुन त्यावर पाणी घातल्यानंतर या मूर्तीची परत माती बनते आणि यामध्ये खोवलेल्या बिया रुजून येतात. त्यामधून रोपे आणि फुले आपल्याला नंतर काही दिवस आनंद देत राहतात, अशी यामागची संकल्पना आहे.

निसर्गातून निर्माण केलेली गणेशमूर्ती परत निसर्गात कोणत्याही हानीविना विसर्जित करणे आणि ती परत करताना त्यातून अधिक काही निसर्गाला देणे हे या कृतीतून साध्य होते. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विज्ञान परिषद, कोल्हापूरचे अध्यक्ष शिवाजीराव पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. पर्यावरणशास्त्र विषयाची विद्यार्थिनी गीतांजली हिने पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरण शास्त्र विभागाच्यावतीने शनिवारी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची कार्यशाळा घेतली. यावेळी तयार झालेल्या मूर्तीसह पर्यावरणप्रेमी मुलगी.

जनसंपर्क कक्ष
1 3 AUG 2017
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ट्री गणेश कार्यशाळा

**कोल्हापूर, प्रतिनिधी**

प्लास्टर ऑफ पॅरिसमुळे पर्यावरणाची हानी होते. यासाठी पर्यावरण प्रदूषण थांबवण्यासाठी अनेक वेगळेवेगळे पर्याय निसगनिच उपलब्ध करून दिले आहेत. अनेक संस्था, संघटना व मंडळे असे इको-फ्रेंडली उपक्रम राबवतात. या उपक्रमांचा प्रचार व प्रसार वेगाने करावा, असे आवाहन आज ट्री गणेश कार्यशाळेत करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कार्यशाळा आयोजित केली होती.

यावेळी गौरव काईंगडे या मूर्तीकाराने शाडूच्या गणेशमूर्ती संदर्भात माहिती दिली. यावेळी कार्यशाळेमध्ये पर्यावरणशास्त्र विभागाचे ९० विद्यार्थी आणि बाहेरील शाळांमधील २५ विद्यार्थ्यांसह नागरिकांनी सहभाग घेतला. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विज्ञान परिषदचे अध्यक्ष शिवाजीराव पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

13 AUG 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात साकारला ट्री गणेश

## पर्यावरणशास्त्र विभागात पार पडली कार्यशाळा



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे ट्री गणेश कार्यशाळेत माहिती देताना मूर्तिकार गौरव काईंगडे. सोबत इतर मान्यवर.** (छाया : एस. अली)

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागातर्फे ट्री गणेश कार्यशाळा शनिवारी घेण्यात आली. निसर्गाला हानी पोहोचविणाऱ्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींऐवजी ट्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्याचे आवाहन केले. मूर्तिकार गौरव काईंगडे यांनी मार्गदर्शन केले.

शहरात गणेशोत्सवाची तयारी सुरू झाली आहे. प्लास्टरच्या गणेशमूर्तींनी होणारे पर्यावरणाचे प्रदूषण थांबवण्यासाठी अनेक वेगवेगळे पर्याय अनेक संस्था, संघटना, मंडळे यांच्याकडून शोधले जात आहेत. या पर्यायांचा प्रचार-प्रसार केला जात आहे. ट्री गणेशसारखी पर्यावरण पूरक संकल्पना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मूर्तिकार गौरव काईंगडे यांनी प्रात्यक्षिकासोबतच सहभागींना मार्गदर्शन केले. यामध्ये शाडूची गणेशमूर्ती बनवून, ती वाळल्यानंतर त्यामध्ये फुलाच्या बिया खोवून या मूर्तीची निर्मिती करण्यात येते. या गणेशमूर्तीचे घरीच एखाद्या कुंडीमध्ये विसर्जन करून त्यावर पाणी घातल्यानंतर या मूर्तीची परत माती बनते आणि यामध्ये खोवलेल्या बिया रुजून येतात आणि त्यामधून रोपे आणि फुले आपल्याला नंतर काही दिवस आनंद देत राहतात, अशी यामागची संकल्पना त्यांनी समजावून दिली. निसर्गातून निर्माण केलेली गणेशमूर्ती परत निसर्गात कोणत्याही हानीविना विसर्जित करणे आणि ती परत करताना त्यातून अधिक काही निसर्गाला देणे हे या कृतीतून साध्य होते, असे मत त्यांनी मांडले. कार्याशाळेमध्ये पर्यावरणशास्त्र विभागाचे ९० विद्यार्थी आणि बाहेरील शाळांमधील २५ विद्यार्थी अशा एकूण ११५ लोकांनी सहभाग घेतला. दुपारी २ ते ५ या वेळेत झालेल्या या कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी विज्ञान परिषदेचे अध्यक्ष शिवाजीराव पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. पी. डी. राऊत यांनी केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
1 3 AUG 2017 Times of India शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Shirke appointed varsity pro-VC

**Kolhapur:** DT Shirke has been appointed the new pro-vice chancellor of Shivaji University, Kolhapur (SUK).



Pro-vice chancellor is the most important position after the post of vice-chancellor, as he is the highest member of almost all the university bodies. An official announcement regarding the same was made on Friday.

According to the Maharashtra Universities Act, 2016, the pro-vice chancellor is the academic and executive officer, after the vice-chancellor, having purview of the entire university.

Before his official appointment as pro-vice chancellor, Shirke was already appointed as the acting pro- vice chancellor of SUK from March 1, earlier this year.

Vice-chancellor of SUK Devanand Shinde, who has been given temporary charge of Mumbai University's vice-chancellor post, congratulated Shirke from Mumbai on Friday.

Shirke told **TOI**, "I have been working for SUK's betterment for the past few years and will continue to do so henceforth. I will make sure the vice chancellor's agenda is fulfilled. Working along with everyone in the university will remain the top priority."

It may be noted that Shirke is from Wathar in Hatkanagale taluka. He studied at Warana College and later on in Vivekananda College. He completed his Bachelor in Science in statistics in 1987. He was appointed as the lecturer in 1990 at the statistics department.

According to official information from the university, Shirke has 27 years of teaching experience, and around 30 years of research experience.

He has also been an active member of the SUK senate committee, management council and academic council for the past 15 years.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 AUG 2017
सकाळ

# डॉ. पवार यांच्या ग्रंथाचे उद्या प्रकाशन

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्रातर्फे सोमवारी (ता. १४) ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या ग्रंथाचे प्रकाशन होत आहे. राजर्षी शाहू साहित्य माला अंतर्गत संपादित कोल्हापूर संस्थानचे पहिले पॉलिटिकल सुपरिंटेंडेंट मेजर डी. सी. ग्रॅहॅम यांनी संकलित केलेल्या 'स्टॅटिस्टिकल रिपोर्ट ऑफ दि प्रिन्सिपली ऑफ कोल्हापूर' (१८५८) असे ग्रंथाचे नाव आहे. राजर्षी शाहू सभागृहात सकाळी अकरा वाजता कार्यक्रमास सुरवात होईल. नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंतराव थोरात यांच्या हस्ते, तर श्रीमंत शाहू छत्रपती महाराज व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथाचे प्रकाशन होणार आहे.